वाशिम जिल्हा पोलीस दल
visit as http://www.washimpolice.org
प्रेस नोट

दिनांक :— २२/०४/२०२०

# मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या १२४ व्यक्तींविरुध्द कलम १८८ भादवि अन्वये गुन्हे दाखल, मास्क न लावलेल्या १२ व्यक्तींकडुन २४००/—रु दंड वसुल करुन, तर ७ विदयार्थ्यांनी शारिरिक कसरत करुन घेण्यात आली.

सदयस्थितीत देशात कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव पाहता केंद्र सरकार तर्फे दिनांक १५/०४/२०२० पासुन दिनांक ०३/०५/२०२० पर्यंत संचारबंदी भाग—२ **(LOCK DOWN)** जाहीर करण्यात आले आहे. ऑरेंज व ग्रिन झोन असलेल्या जिल्हयात दिनांक २०/०४/२०२० पासुन शासनातर्फे काही अत्यावश्यक सेवेमध्ये अल्प प्रमाणात सुट देण्यात आली. सदर बाबीचा गैरअर्थ काढुन लोकांनी सकाळी मॉर्निंग वॉकला जाणे, बाजारात विना मास्क फिरणे,विनाकारण चौकात उभे राहणे इत्यादी अनावश्यक कृतीला प्राधान्य दिले. जनतेकडुन संचारबंदीचे/लॉक डाऊन चे व्यवस्थित पालन होत नसल्याचे पोलीस अधिक्षक श्री वसंत परदेशी यांचे निदर्शनास येताच त्यांनी कायदयाचे उल्लंघन करणाऱ्या इसमाविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्याचे आदेश सर्व ठाणेदार वाशिम जिल्हा यांना देवुन उपविभागीय पोलीस अधिकारी श्री संजय पाटील,श्री.यशवंत केडगे,डॉ.श्री. पवन बन्सोड यांना आपआपले उपविभागात देखरेख करुन मार्गदर्शन करण्याबाबत सुचित केले.

दिनांक २२/०४/२०२० रोजी वाशिम जिल्हयात पोलीस अधिक्षक श्री वसंत परदेशी, अपर पोलीस अधिक्षक श्री. विजयकुमार चव्हाण यांचे मार्गदर्शनात विशेष मोहिम राबविण्यात आली. या मोहिमे दरम्यान वाशिम जिल्हयात कायदयाचे पालन न करणाऱ्या एकुण १२४ इसमाविरुध्द भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ अन्वये वेगवेगळया पोलीस ठाण्यात एकुण १२४ गुन्हे दाखल करण्यात आले असुन, विनामास्क फिरणाऱ्या १२ लोकांवर कार्यवाही करुन २४००/—रु दंडाची वसुली करण्यात आली तसेच अनसिंग येथील ७ विदयार्थ्यांनी कायदयाचे पालन न केल्याने त्यांच्याकडुन शारिरिक कसरत करुन घेण्यात आली.

महाराष्ट्रात दिवसेंदिवस कोरोनाचे रुग्णामध्ये सतत वाढ होत असुन अनेक ठिकाणी कोरोनाचे रुग्ण सापडत आहेत. दिनांक २०/०४/२०२० पासुन शासनाकडुन देण्यात आलेल्या सवलतींचा गैरअर्थ लावुन काही लोक नियमांचे उल्लंघन करुन स्वतःचा तसेच आपल्या कुटुंबातील जिव धोक्यात घालत आहेत. ( जसे एखादया कोरोना पॉझीटिव्ह रुग्णाने रस्त्यावर थुंकल्यास व सदर थुंकीवर सर्वसाधारण व्यक्तीचा पाय पडल्यास थुंकी मधील कोरोनाचे विषाणु संबधित व्यक्तीचे चप्पल/बुटाला चिकटुन ते सदर विषाणु आपल्या घरापर्यंत [illegible]न स्वतःचा व कुटुंबातील व्यक्तींचा जिव धोक्यात घालत आहेत.)

जिल्हा पोलीस अधिक्षक श्री.वसंत परदेशी यांचे तर्फे वाशिम जिल्हयातील सर्व जनतेला पुन्हा आवाहन करण्यात येत आहे की, कृपया जनतेने शासनाने घालुन दिलेल्या नियमाचे पालन करावे लहानसहान कामासाठी घराबाहेर पडु नये, अत्यावश्यक कामासाठी घराबाहेर पडलयास मास्कचा नियमित वापर करावा व सोशल डिस्टंसींगचे पालन करावे. वाशिम जिल्हयातील सर्व जनतेने,शासकिय/निमशासकिय अधिकारी/कर्मचारी, पदाधिकारी यांनी घेतलेल्या परिश्रमामुळेच कोरोना सारख्या संसर्ग पसरविणाऱ्या विषाणुला मोठया प्रमाणात आळा घालण्यास यशस्वी झालो आहोत यापुढे सुध्दा सर्वांनी सहकार्य करुन प्रशासनास मदत करावी. ज्या व्यक्ती नियमाचे पालन करणार नाहीत त्यांचे विरुध्द पोलीस दलातर्फे कठोर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

Sthakare 22/04/2020
पोलीस निरिक्षक
स्थानिक गुन्हे शाखा, वाशिम